LAN Number - SHLHNASK0000499 **1. MR. YOGESH CHANDRABHAN PAWAR (Borrower)** **2. MRS. PUSHPA YOGESH PAWAR (Co-Borrower)** **All Residing At- Current Address & Propeerty Address: AT POST:- RESIDENTIAL BUILDING MILAKAT GPH NO. 350 OPP RAJE PARK HOTEL OPP RAJE PARK HOTEL SONAMBE, VADGAON PHATA,SONARI GAON, SONAMBE SINNAR NASHIK MAHARASHTRA - 422103** **Loan Amount – Rs.33,10,909/-** **LAN .- SHLHNASK0000499,** **NPA Date – 03/10/2026**	**All that consisting of AT SONAMBE GPH NO.350 Carpet adm area 2025 Sq.Ft. (188.19 Sq.Mtrs & Built-Up Area 3243 Sq. Ft (301.30 Sq.Mtrs) Along with entire construction thereon Consisting of Ground And First Floor, opp raje park hotel opp raje park hotel sonambe, vadgaon phata,sonari gaon within the limit GPH Sonambe At Village Mouje. Sonambe Tal Sinnar & Dist Nashik-422103.** **East- Mr. Shivaji Dada Pawar GPH No.347** **West- Mr. Sagar Vasant Pawar GPH No.352** **North- Gaon Road** **South- Mr. Nivrutti Baburao Pawar GPH No.351**	Demand Notice Date - 15-10-2026 Demand notice Amount- Rs. 34,61,936/- (Rupees Thirty-Four Lakh Sixty One Thousand Nine Hundred and Thirty Six Only) as on dated. 12-10-2026 under reference of Loan Account No. SHLHNASK0000499.

You the borrowers are therefore called upon to make the payment of the outstanding dues as mentioned hereinabove in full within 60 days of this notice failing which the undersigned shall be constrained to take action under the SARFAESI Act, to enforce the abovementioned securities. Please note that as per Sec 13(13) of the said act, you are restrained from transferring the above referred securities by way of sale, lease, or otherwise without our consent.

Place : Nashik
Date: 20-10-2026
Sd/- Authorised Officer- Truhome Finance Limited
(Earlier Known as Shriram Housing Finance Limited)

YASH MANAGEMENT & SATELLITE LTD.

Regd Office: 303, Morya Landmark I, Opp Infiniti Mall, Off. New Link Road, Andheri (West), Mumbai-400053 **CIN: L65920MH1993PLC073309**

Extract of Unaudited Standalone and Consolidated Financial Results for the Quarter and Half Year Ended 30th September, 2026

(Rs. In Lakhs)

Sr. No.	Particulars	STANDALONE						CONSOLIDATED					
		Quarter Ended			Half Year Ended		Year Ended	Quarter Ended			Half Year Ended		Year Ended
		30.09.2026	30.06.2026	30.09.2025	30.09.2026	30.09.2025	31.03.2026	30.09.2026	30.06.2026	30.09.2025	30.09.2026	30.09.2025	31.03.2026
		(Unaudited)			(Unaudited)		(Audited)	(Unaudited)			(Unaudited)		(Audited)
1.	Total Income from Operations	1039.83	993.76	361.82	2033.59	835.49	2803.89	1151.53	1053.82	379.96	2205.35	866.07	2825.33
2.	Net Profit/(Loss) before Exceptional items and Tax	(0.06)	87.69	(104.57)	87.63	(89.89)	(0.98)	30.49	138.62	(75.68)	169.11	(50.61)	16.71
3.	Net Profit/(Loss) before tax after Exceptional items	(0.06)	87.69	(104.57)	87.63	(89.89)	(0.98)	30.49	138.62	(75.68)	169.11	(50.61)	16.71
4.	Net Profit/(Loss) after tax	10.59	74.20	(102.72)	84.79	(89.89)	(0.98)	41.14	125.13	(73.83)	166.27	(50.61)	16.72
5.	Total Comprehensive Income for the period net of tax	(7.03)	133.11	(92.65)	126.08	(40.01)	19.17	23.52	184.04	(63.76)	207.56	(0.73)	36.87
6.	Equity Share Capital (Face value Rs. 10/- per share)	1700	1700	1700	1700	1700	1700	1700	1700	1700	1700	1700	1700
7.	Reserve excluding Revaluation Reserve	-	-	-	992.14	807.06	866.23	-	-	-	-	-	
8.	Earnings Per Share												
	1. Basic& Diluted:	(0.04)	0.78	(0.55)	0.74	(0.24)	0.11	0.07	0.97	(0.44)	1.03	(0.09)	0.18

Notes:

1. The above unaudited consolidated and standalone financial results have been reviewed by the Audit Committee and have been approved by the Board of Directors at their respective meetings held on 19th October, 2026 pursuant to Regulation 33 of SEBI (Listing Obligation and Disclosure Requirements), Regulations 2015 (as amended), The above results have been prepared in accordance with Indian Accounting Standards ('Ind AS') notified under Section 133 of the Companies Act, 2013, read together with the Companies (Indian Accounting Standards) Rules, 2015 (as amended).
2. The above is the extract of the detailed format of Quarterly financial results filed with the Bombay Stock Exchange Limited under regulation 33 SEBI (Listing Obligation and Disclosure Requirements), Regulations 2015. The full format of Quarterly /Annual Financial Results are available at www.bseindia.com and www.yashmanagement.in.

Place: Mumbai
Date: 19th October, 2026

By order of the Board
For Yash Management and Satellite Ltd
Sd/-
Yash Gupta
Managing Director
DIN:07638743

BAJAJ FINANCE LIMITED

CIN: L65910MH1987PLC042961
Registered Office: 4th Floor, Bajaj Finserv House, Off Pune-Ahmednagar Road, Viman Nagar, Pune – 411014
Tel.: 020 71576403 | **Fax:** 020 71576364
Email ID: investor.service@bajajfinserv.in | **Website:** https://www.aboutbajajfinserv.com/finance-about-us

Extract of unaudited consolidated financial results for the Quarter and Half year ended 30 September 2026

(₹ in crore)

Sr. No.	Particulars	Quarter ended 30.09.2026 (Unaudited)	Half year ended 30.09.2026 (Unaudited)	Quarter ended 30.09.2025 (Unaudited)
1	Revenue from operations	24,546.37	47,711.82	19,990.42
2	Profit before tax	8,537.20	16,686.20	6,608.13
3	Profit after tax	6,366.57	12,447.17	4,947.76
4	Total comprehensive income (Comprising profit for the period and other comprehensive income after tax)	6,319.91	12,589.89	4,752.63
5	Paid-up equity share capital	622.39	622.39	621.51
6	Other equity as shown in the Balance Sheet of the previous year			113,377.23
7	Earnings per share (not annualised) (Face value of ₹ 1 each)			
	Basic (₹)	10.07	19.69	7.85
	Diluted (₹)	10.05	19.64	7.83

Key standalone financial information is given below:

(₹ in crore)

Sr. No.	Particulars	Quarter ended 30.09.2026 (Unaudited)	Half year ended 30.09.2026 (Unaudited)	Quarter ended 30.09.2025 (Unaudited)
1	Total Income	20,919.40	40,722.50	17,004.53
2	Profit before tax	7,420.81	14,583.67	5,703.28
3	Profit after tax	5,536.10	10,881.62	4,250.77

Note : The above is an extract of the unaudited financial results for the quarter and half year ended 30 September 2026 which have been reviewed by the Audit Committee and approved by Board of Directors at its meeting held on 19 October 2026, subjected to limited review by joint statutory auditors and filed with the stock exchanges under Regulation 33 and 52 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, as amended. These financial results have been prepared in accordance with Indian Accounting Standards prescribed under section 133 of the Companies Act, 2013 read with the Companies (Indian Accounting Standards) Rules, 2015 as amended from time to time and other recognised accounting practices generally accepted in India along with the circulars, guidelines and directions issued by the Reserve Bank of India (RBI) and the National Housing Bank (NHB) from time to time. The full format of the aforesaid financial results is available on the website of the Company, BSE Limited and National Stock Exchange of India Limited i.e. https://www.aboutbajajfinserv.com/finance-about-us, www.bseindia.com and www.nseindia.com respectively.

Pune
19 October 2026

By order of the Board of Directors
For **Bajaj Finance Limited**

Rajeev Jain
Vice Chairman & Managing Director
DIN: 01550158

मुंबई मित्र
...रोज नवकाही वाचता-विचारण्यास मजकूर!
मुंबई उपनगर
9870695106 9400110276
dailymumbaimitra
www.mumbaimitra.com
मंगळवार | २० ऑक्टोबर २०२६
समुह संपादक : अभिजीत राणे

गोरेगाव-मुलुंड जोडरस्ता, किनारी मार्गाला गती

मे २०२९ पूर्वी मुंबईतील महत्त्वाचे पायाभूत प्रकल्प पूर्ण करण्याचे लक्ष्य

■ प्रतिनिधी, मुंबई

मुंबईतील पायाभूत सुविधांचा विकास वेगाने करण्यासाठी महापालिका प्रशासनाने महत्त्वाच्या प्रकल्पांच्या कामांना गती देण्यावर भर दिला आहे. गोरेगाव-मुलुंड जोडरस्ता, वर्सोवा-दहिसर-भाईंदर किनारी मार्ग आणि गारगाई धरण प्रकल्प मे २०२९ पूर्वी पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. या प्रकल्पांची कामे निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रशासकीय पातळीवर नियोजन करण्यात येत आहे.

मुंबई महापालिकेने चालू आर्थिक वर्षासाठी सुमारे ८० हजार कोटी रुपयांचा अर्थसंकल्प मांडला असून, त्यामध्ये ४८ हजार कोटी रुपयांची तरतूद भांडवली खर्चासाठी करण्यात आली आहे. रस्त्यांचे काँक्रीटीकरण, वाहतूक कोंडी कमी करणे, पाणीपुरवठा सुधारणे आणि सांडपाण्यावर प्रक्रिया करणे यांसारख्या पायाभूत सुविधांच्या कामांना या निधीतून प्राधान्य दिले जाणार आहे.



गोरेगाव-मुलुंड जोडरस्त्यामुळे पूर्व-पश्चिम संपर्क सुधारणार

गोरेगाव-मुलुंड जोडरस्ता हा मुंबईतील महत्त्वाच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांपैकी एक आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर पश्चिम द्रुतगती महामार्ग आणि पूर्व द्रुतगती महामार्ग यांच्यातील संपर्क अधिक सुलभ होणार आहे. त्यामुळे पूर्व आणि पश्चिम उपनगरांदरम्यानचा प्रवासाचा वेळ कमी होण्यास मदत होईल. तसेच वाहतूक कोंडी कमी करण्याच्या दृष्टीनेही हा प्रकल्प महत्त्वाचा ठरणार आहे.

वर्सोवा-दहिसर-भाईंदर किनारी मार्गाला गती

मुंबई महापालिकेतर्फे वर्सोवा-दहिसर किनारी मार्गाचे काम हाती घेण्यात आले आहे. हा मार्ग पुढे भाईंदर उन्नत मार्गाशी जोडण्याचे नियोजन आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर नरिमन पॉइंटपासून दहिसर आणि भाईंदरपर्यंतचा प्रवास अधिक सुलभ होण्याची अपेक्षा आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जून महिन्यात या प्रकल्पाची पाहणी केली होती. प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी आवश्यक परवानग्या मिळविणे आणि प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करण्यावर भर दिला जात आहे.

रस्ते काँक्रीटीकरणाची कामे २०२९ पूर्वी पूर्ण करण्याचे नियोजन

मुंबईतील रस्त्यांचे काँक्रीटीकरण करण्यासाठी महापालिकेने दोन टप्प्यांत मोठ्या निविदा काढल्या होत्या. पहिल्या दोन टप्प्यांतील कामे २०२७ पर्यंत, तर उर्वरित कामे २०२९ पूर्वी पूर्ण करण्याचे नियोजन आहे. या कामांमुळे रस्त्यांची गुणवत्ता सुधारण्यासोबतच वारंवार होणारी दुरुस्ती आणि देखभालीवरील खर्च कमी होण्याची अपेक्षा आहे.

गारगाई धरण प्रकल्पावरही लक्ष

मुंबईच्या भविष्यातील पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने गारगाई धरण प्रकल्प महत्त्वाचा मानला जात आहे. शहराची वाढती पाण्याची गरज लक्षात घेता या प्रकल्पाचा पूर्ततेला महत्त्व देण्यात येत आहे. गोरेगाव-मुलुंड जोडरस्ता, किनारी मार्ग, रस्त्यांचे काँक्रीटीकरण आणि गारगाई धरण यांसारखे प्रकल्प वेळेत पूर्ण झाल्यास मुंबईच्या वाहतूक व्यवस्थेला आणि पायाभूत सुविधांना मोठी चालना मिळण्याची अपेक्षा आहे.



- बीड जिल्ह्यातील माजलगावजवळ खड्डा चुकवताना झालेल्या अपघातात अकरा वर्षांच्या मुलासह पाच जणांचा बळी गेला. देवीच्या दर्शनाला निघालेली मणसे घेट मृत्यूच्या दारात पोहोचली! आता चालकाचा वेग, वाहनावरील नियंत्रण यांची चौकशी होईल. पण रस्त्यावरील खड्ड्यांचे काय? रस्त्याचे कंत्राट देणारा अधिकारी, काम करणारा ठेकेदार, गुणवत्ता तपासणारा अभियंता आणि देखभालीची जबाबदारी असणारी यंत्रणा यांची चौकशी कोण करणार? दरवषी हजारो कोटींच्या रस्त्यांची घोषणा होते. मग पहिल्याच पावसात त्यांचे डांबर कुठे वाहून जाते? निकृष्ट काम करणाऱ्यांना काळ्या यादीत टाकणे, नुकसानभरपाई वसूल करणे आणि निष्काळजीपणामुळे मृत्यू झाल्यास सिद्ध झाल्यास फौजदारी जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. आजवर खड्ड्यांमुळे मृत्यू झाल्यावर काही लाखांची मदत देऊन प्रकरण मिटवले जाते. पण जनतेच्या पैशातून तयार झालेला रस्ता जनतेचाच जीव घेत असेल तर हा केवळ अपघात नाही, तो सरकारी व्यवस्थेच्या बेफिकिरीचा रक्तरंजित पुरावा आहे!
- नागपूर शहराला भविष्यात पाणीटंचाईची भीती आहे आणि दुसरीकडे पर्यायी पाणीस्रोत असलेल्या गोरेवाडा तलावात सर्रास सांडपाणी मिसळते आहे! उच्च न्यायालयाच्या निर्देशानंतरही महापालिकेच्या कारभारात अपेक्षित सुधारणा झालेली दिसत नाही. महाराष्ट्राच्या उपराजधानीतील ही अवस्था असेल तर इतर शहरांची काय कथा? पाऊस कमी पडला की निसर्गाला दोष द्यायचा, धरणातील साठा घटला की नागरिकांवर पाणीकपात लादायची आणि उपलब्ध जलस्रोतांचे संरक्षण करण्याची वेळ आली की प्रशासनाने डोळ्यांवर पट्टी बांधायची! हा कसला कारभार? कोट्यवधी रुपये खर्चून जलसंधारणाच्या योजना आखल्या जातात; पण हाताशी असलेला पाणीसाठा दूषित होऊ नये याचीही खबरदारी घेतली जात नाही. तलावात सांडपाणी सोडणाऱ्यांवरोबरच ते रोखण्याची जबाबदारी असणाऱ्यांवरही कारवाई झाली पाहिजे. कारण पाण्याची टंचाई ही निसर्गनिर्मित असू शकते; पण उपलब्ध पाण्याची नासाडी ही संपूर्णपणे मानवनिर्मित असते. नागपूरकरांना पाणीबचतीचे उपदेश देणाऱ्यापूर्वी महापालिकेने स्वतःची निष्क्रियता थांबवावी!
- मुंबईतील जोगेश्वरीच्या शंकरवाडी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाशी संबंधित कथित एक हजार कोटींच्या फसवणुकीच्या प्रकरणात गुन्हे शाखेने क्लोजर रिपोर्ट दाखल केला आहे. तपासात समभाग हस्तांतरण कायदेशीररीत्या पूर्ण झाल्याचा पुरावा न मिळाल्याने आरोपांना आधार नसल्याचा पोलिसांचा निष्कर्ष आहे. आता न्यायालयाचा निर्णय महत्त्वाचा ठरेल. पण या प्रकरणाने एक वेगळाच प्रश्न उपस्थित केला आहे. हजार कोटींच्या घोटाळ्याचा आरोप करणे सोपे; तो सिद्ध करणे किती कठीण! आरोप खरे असतील तर दोषींना कठोर शिक्षा झालीच पाहिजे. मात्र खोटे आरोप करून व्यावसायिक प्रतिष्ठा उद्धवस्त करण्याचाही अधिकार कोणाला नाही. दुसरीकडे पोलिसांनी क्लोजर रिपोर्ट दिला म्हणजे प्रत्येक प्रश्न संपला, असेही नाही. तक्रारदाराला न्यायालयात आक्षेप घेण्याचा अधिकार आहे. मुंबईतील पुनर्विकास प्रकल्पांत हजारो कुटुंबांचे भविष्य गुंतलेले असते. म्हणूनच शासन प्रकरणात राजकीय आरडाओरड नव्हे, तर पारदर्शक व्यवहार, स्वतंत्र तपास आणि न्यायालयीन कसोटीवर टिकणारे पुरावे आवश्यक आहेत. अन्यथा पुनर्विकासापेक्षा वादविवादाचाच उद्योग मोठा होईल!
- छत्रपती संभाजीनगरमध्ये अन्न व औषध प्रशासनाने दोन शीतगृहांतून तब्बल चार कोटी अठरा लाख रुपयांचा सुमारे दोन लाख किलो खाद्यपदार्थांचा संशयास्पद साठा जप्त केला. लेबल नसलेली मिरचीपूड, अस्वच्छ साठवणूक, तापमान नियंत्रणातील त्रुटी आणि आवश्यक स्वच्छतेचा अभाव आढळला. आता प्रयोगशाळेच्या अहवालातून पदार्थांच्या गुणवत्तेचा निर्णय होईल. पण एवढा प्रचंड साठा नियमांचे उल्लंघन करून टेवला जात असल्याचा संशय निर्माण होईपर्यंत संबंधित निरीक्षक काय करत होते? रसणासूदीला धाडी टाकून प्रसिद्धी मिळवणे सोपे आहे. वर्षभर ग्राहकांच्या आरोग्यावर नजर टेवण्याचे काय? मागुस बाजारात अन्न विकत घेतो, विष नव्हे! भेसळ सिद्ध झाल्यास उत्पादक, साठवणूकदार आणि विक्रेते यांच्यावर कठोर कारवाई झालीच पाहिजे. पण नियमित तपासणीत हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांनीही जबाबदार धरले पाहिजे. कारण नागरिकांच्या आरोग्याची हमी देणाऱ्या यंत्रणेच डोळेझाक केली तर अन्नसुरक्षा कायदा केवळ कागदावर उरतो. खाद्यपदार्थांच्या वेष्टनावरची मुदत वाचणाऱ्या ग्राहकाने सरकारी यंत्रणेच्या प्रामाणिकपणाची खात्री कुठून करायची?
- कोल्हापूरच्या गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीत लोकशाहीने अक्षरशः टेवघर गाठले! मंत्री हसन मुश्रीफ यांनी रौदतीच्या यल्लमा देवीच्या साक्षीने उरावधारकांना पक्षनिष्ठेच्या शपथा घातल्याचे वृत्त आहे. देवीचा कोप होण्याची भीतीही दाखवल्याचा आरोप आहे. मतदानासाठी पैशांची पाकिटे वाटली जात असल्याचीही चर्चा रंगली आहे. मग एक थट्टेखेर प्रश्न विचारायला वाटतो. पैसे वाटूनही निष्ठा विकत घेता येणार नाही, अशी भीती वाटल्यामुळे देवांची भीती घालण्याची वेळ आली काय? पैसे घेतलेला मतदार ऐनवेळी उलटा फिरला तर? म्हणून नोटांच्या गड्ड्यांना देवीच्या शपथेचे विमाकवच चढवले काय? शाहू महाराजांच्या पुरोगामी कोल्हापुरात सहकाराची लोकशाही इतक्या हास्यास्पद पातळीवर पोहोचावी, ही लाजिरवाणी बाब आहे. सहकारातील नेते स्वतःच्या कार्यकर्त्यांवर विश्वास ठेवू शकत नसतील तर जनतेने त्यांच्यावर विश्वास का ठेवावा? राजकारणासाठी देवाचा वापर करणाऱ्यांनी एवढे लक्षात ठेवावे की, देवासमोर शपथ घेता येते; पण मतपेटीत पडणाऱ्या मताचा विवेक कोणत्याही नेत्याच्या मालकीचा नसतो!

वांद्रेतील हिल रोडवरील पदपथ अतिक्रमणमुक्त करण्याची मोहीम

■ प्रतिनिधी, मुंबई

कारवाई सुरूच राहणार

मुंबईकरांना मोकळ्या पदपथांवरून चालता यावे, यासाठी मुंबई महापालिकेने हाथातवरी प्रथमह्र अभियान हाती घेतले आहे. महापालिका आयुक्त अश्विनी भिडे यांच्या आदेशानुसार, मुंबईतील २६ विभागीय कार्यालयांच्या कार्यक्षेत्रात पदपथांवरील अतिक्रमणांविरोधात कारवाई करण्यात येत आहे. या अभियानांतर्गत वांद्रे येथील हिल रोडवरील पदपथ अतिक्रमणमुक्त करण्याची मोहीम सुरू असून, ही कारवाई यापुढेही सुरू राहणार असल्याचा इशारा एच-पश्चिम विभागाचे सहाय्यक आयुक्त दिनेश पल्लेवाड यांनी दिला आहे. उपायुक्त विश्वास मोटे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात येत आहे.



मुंबईतील सुमारे ५० टक्के नागरिक पायी प्रवास करतात. त्यामुळे पादचाऱ्यांना सुरक्षितपणे आणि अडथळ्यांविना चालता यावे, यासाठी पदपथ मोकळे टेवण्यावर महापालिकेने भर दिला आहे. दरम्यान, शनिवारी हिल रोड परिसरात करण्यात आलेल्या कारवाईदरम्यान अनधिकृत शेड, विविध वस्तू आणि पदपथावरील इतर अडथळे हटविण्यात आले. तसेच पदपथावरील टी गार्ड आणि इतर साहित्य हटवून परिसराची स्वच्छता करण्यात आली. पदपथांवरील अतिक्रमणे हटवून ते पादचाऱ्यांसाठी मोकळे करण्याची मोहीम यापुढेही सातत्याने सुरू राहणार असल्याचे सहाय्यक आयुक्त दिनेश पल्लेवाड यांनी स्पष्ट केले.

अडीच लाख दागिने चोरणारा जावयाला अटक

■ प्रतिनिधी, मुंबई

सासरवाडीत ये-जा करण्याचा फायदा घेत नातेवाइकांच्या घरातून सुमारे दोन लाख २७ हजार रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने चोरणाऱ्या जावयाला विक्रोळी पोलिसांनी अटक केली आहे. विजय गुप्ता असे आरोपीचे नाव असून, तो भांडुप येथे राहतो. पोलिसांनी चोरीस गेलेले सर्व दागिने हस्तगत केल्याची माहिती दिली. विक्रोळीतील टागोरनगर येथील इमारत क्रमांक १६ मधील फिर्यादीच्या घरातून सप्टेंबर महिन्यापासून ९ ऑक्टोबरदरम्यान सोन्या-चांदीचे दागिने चोरीला गेले होते. फिर्यादी यांच्या पत्नीने हे दागिने पलंगात ठेवले होते. मात्र, दागिने गायब झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी विक्रोळी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

त्यानुसार पोलिसांनी चोरीचा गुन्हा नोंदवून तपास सुरू केला.

वरिष्ठ पोलिस निरीक्षक विक्रम चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक महेश जाधव (गुन्हे), पोलिस उपनिरीक्षक विकास चव्हाण आणि गुन्हे प्रकटीकरण पथकाने तपासाची सूत्रे हाती घेतली. फिर्यादीच्या घरातील सदस्यांकडे चौकशी केली असता, विजय गुप्ता हा त्यांचा जावई असून, त्याचे घरी येणे-जाणे असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

या माहितीच्या आधारे पोलिसांनी विजय गुप्ता याला ताब्यात घेऊन चौकशी केली. चौकशीदरम्यान त्याने चोरी केल्याची कबुली दिल्यानंतर पोलिसांनी त्याला अटक केली. पुढील तपासादरम्यान चोरीस गेलेले सोन्या-चांदीचे दागिने हस्तगत करण्यात आले. या प्रकरणाचा पुढील तपास विक्रोळी पोलिस करीत आहेत.

दिव्यांग मुलांना पेन्शनचा मार्ग मोकळा

■ प्रतिनिधी, मुंबई

पेन्शन वाढविण्याची मागणी

केंद्र सरकारने दिव्यांग पेन्शन योजनेचे निकष दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ शी सुसंगत करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचे दिव्यांग मुले आणि दुर्मिळ आजारांनी ग्रस्त असलेल्या मुलांच्या पालकांनी स्वागत केले आहे. योजनेसाठीची किमान वयोमर्यादा हटविणे आणि किमान दिव्यांगत्वाचे प्रमाण ८० टक्क्यांवरून ४० टक्क्यांपर्यंत कमी करणे, यामुळे अधिक लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. आतापर्यंत निकषांमुळे योजनेपासून वंचित राहिलेल्या कुटुंबांना आर्थिक मदत मिळू शकेल.

मात्र, दिव्यांग मुलांची देखभाल करणारे पालक आणि दिव्यांग हक्कांसाठी काम करणाऱ्या संघटनांनी सध्याच्या आर्थिक मदतीबाबत नाराजी व्यक्त केली आहे. ८० वर्षांखालील लाभार्थ्यांना दरमहा ३७५ रुपये, तर ८० वर्षे आणि त्यापुढील वयाच्या लाभार्थ्यांना दरमहा ६२५ रुपये दिले जातात. दीर्घकालीन उपचार आणि देखभालीचा खर्च लक्षात घेता ही रक्कम अत्यंत अपुरी असल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

पेन्शनच्या रकमेत वाढ करून ती महागाईशी जोडावी, कायद्यातील तरतुदींची अंमलबजावणी करावी, तसेच दिव्यांगत्व प्रमाणपत्र आणि यूनिक डिसॅबिलिटी आयडी कार्ड मिळविण्याची प्रक्रिया सुलभ करावी, अशी मागणी करण्यात येत आहे. वासाटी एकखिडकी पद्धत सुरू करण्याचीही मागणी पालकांनी केली आहे.



व्यापक लाभक्षेत्र; मात्र आर्थिक मदत अपुरी

नवी मुंबईतील क्युअर स्यायनल मस्क्युलर ॲट्रोफी फाउंडेशनच्या संस्थापक-अध्यक्षा अल्पना शर्मा यांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. त्यांचा मुलगा आरव हा स्यायनल मस्क्युलर ॲट्रोफीच्या दुसऱ्या प्रकाराने ग्रस्त आहे. दुर्मिळ आजारांनी ग्रस्त मुलांच्या कुटुंबांना सुरुवातीपासूनच मोठा आर्थिक खर्च सहन करावा लागतो. त्यामुळे जन्मापासून पेन्शनचा लाभ देण्याचा निर्णय हा सर्वसमावेशक प्रशासनाच्या दिशेने संवेदनशील आणि प्रगतिशील पाऊल असल्याचे शर्मा यांनी सांगितले.

मात्र, लाभार्थ्यांची व्याप्ती वाढविण्यावरोबरच आर्थिक मदतही पुरेशी असणे आणि प्रशासकीय प्रक्रिया सोपी करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सध्याची ३७५, आणि ६२५ रुपयांची मदत केवळ नाममात्र असून, ती महागाईशी जोडावी. तसेच काय्हात अपेक्षित असलेली २५ टक्के अतिरिक्त मदत अनियार्य करावी, अशी मागणी त्यांनी केली.

दुर्मिळ आजारांवरील उपचारांसाठी तज्ज्ञ डॉक्टर शोधणे आणि दिव्यांगत्व प्रमाणपत्र मिळविण्याची प्रक्रिया पूर्ण करणे, या दोन्ही बाबी कुटुंबांसाठी कठीण ठरतात. त्यामुळे संवेदनशील आणि प्रशिक्षित अधिकाऱ्यांसह एकखिडकी व्यवस्था उभारणे आवश्यक आहे. यामुळे पात्र मुलांना योजनेचा लाभ मिळविणे सोपे होईल,

उपचार आणि देखभालीवर दरमहा ५० हजारांहून अधिक खर्च

कर्जतजवळील वांजणवाडी येथील माधुरी थोरवे यांच्यासाठीही योजनेतील बदल दिलासादायक आहेत. मात्र, आर्थिक मदत अपुरी असल्याची त्यांची तक्रार आहे. त्यांचा ११ वर्षांचा मुलगा आहान हा एसएमपीई या आजारामुळे अंथरुणाला खिळून असून, त्याला ९० टक्के दिव्यांगत्व आहे. दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र मिळविण्याची प्रक्रिया अजूनही किचकट आहे. मुलाच्या डायपर, थेरपी आणि औषधांवर दरमहा ५० हजार रुपयांपेक्षा अधिक खर्च होतो. त्या तुलनेत सध्याची पेन्शन अत्यंत कमी असल्याचे माधुरी थोरवे यांनी सांगितले. सरकारला पेन्शनमध्ये तातडीने मोठी वाढ करणे शक्य नसेल, तर किमान आवश्यक वैद्यकीय साहित्यावर अनुदान किंवा सवलत द्यावी. त्यामुळे दिव्यांग मुलांच्या देखभालीचा मोठा आर्थिक भार सहन करणाऱ्या कुटुंबांना प्रत्यक्ष दिलासा मिळेल, अशी मागणी त्यांनी केली आहे.

वरळीतील पालिकेचा भूखंड ४७० कोटींना भाडेपट्ट्यावर देण्याची तयारी

विकासक उभारणार नवी प्रयोगशाळा

■ प्रतिनिधी, मुंबई

मुंबई महापालिकेच्या वरळी येथील प्रयोगशाळा असलेला ५,१६६ चौरस मीटरचा भूखंड ६० वर्षांच्या दीर्घकालीन भाडेपट्ट्यावर खासगी विकासकाला देण्याची तयारी सुरू आहे. या भूखंडासाठी स्काय्रस्टेड कन्स्ट्रक्शन्स एलएलपी या कंपनीने ४७० कोटी रुपयांची सर्वाधिक बोली लावली आहे. पालिकेने या भूखंडाची अंदाजित किंमत ४५५ कोटी रुपये निश्चित केली होती. त्यामुळे कंपनीने निर्धारित किमतीपेक्षा १५ कोटी रुपये अधिक बोली लावली आहे. मात्र, या प्रस्तावाला अद्याप पालिकेच्या सुधार समितीची मंजुरी मिळालेली नाही. तसेच भूखंडावरील आरक्षण हटविण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच पुढील कार्यवाही केली जाणार आहे.

वरळीतील या भूखंडाचा दीर्घकालीन भाडेपट्ट्याने विकास करण्याचा प्रस्ताव सुधार समितीसमोर मंजुरीसाठी सादर करण्यात आला आहे. समितीची मंजुरी मिळाल्यानंतर भूखंडावरील आरक्षण हटविण्याची प्रक्रिया राबविण्यात येईल. वासाटी नागरिकांकडून हरकती आणि सूचना मागविण्यात येणार आहेत. त्यामुळे भूखंडाच्या वापरात बदल करण्याच्या प्रक्रियेत नागरिकांच्या अभिप्रायाला महत्त्व राहणार आहे.



विकासकाच्या खर्चातून उभारणार नवी प्रयोगशाळा

निविदेतील अटींनुसार, संबंधित विकासकाला स्वतःच्या खर्चाने १,२९९ चौरस मीटर क्षेत्रफळाची नवीन प्रयोगशाळा बांधून ती मुंबई महापालिकेकडे हस्तांतरित करावी लागणार आहे. नवीन प्रयोगशाळेचे बांधकाम पूर्ण होईपर्यंत सध्याच्या प्रयोगशाळेशेजारी पर्यायी जागेची व्यवस्थाही संबंधित विकासकाला करावी लागणार आहे. नवीन प्रयोगशाळेचे बांधकाम पूर्ण होण्यापूर्वी विद्यमान इमारत पाडता येणार नाही.

आठ महिन्यांत उर्वरित ७० टक्के रक्कम भरण्याची अट

मंजुरीपत्र जारी झाल्यानंतर एका महिन्याच्या आत विकासकाला बोलीच्या एकूण रकमेपैकी ३० टक्के रक्कम जमा करावी लागणार आहे. उर्वरित ७० टक्के रक्कम पुढील आठ महिन्यांत हप्त्यांनी भरावी लागेल.

पीडित कुटुंबाकडून कटाचा संशय

दिंडोशीत १८ महिन्यांच्या चिमुरडीच्या मृत्यूप्रकरणाला नवे वळण

■ प्रतिनिधी, मुंबई

गोरेगाव पूर्वेकडील दिंडोशी परिसरात १८ महिन्यांच्या चिमुरडीला सहाव्या मजल्यावरून मोकळ्या डक्टमध्ये फेकल्याने तिचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना १४ ऑक्टोबरच्या रात्री घडली होती. या प्रकरणात संशयित असलेल्या दहा वर्षांच्या अल्पवयीन मुलीच्या आईनेच कथित कट रचला असावा, असा संशय मृत चिमुरडीच्या कुटुंबीयांनी व्यक्त केला आहे. आपल्याला घर विकाने करण्यास भाग पाडण्यासाठी हा प्रकार घडवून आणला असावा, असा आरोपही कुटुंबीयांनी केला आहे. मात्र, या आरोपांना अद्याप अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. मृत चिमुरडीच्या वडिलांनी संशयित मुलीच्या आईच्या भूमिकेची चौकशी करण्याची मागणी केली आहे. दरम्यान, संशयित मुलीचे कुटुंब संबंधित इमारतीतून निघून गेले असून, ते पोलिसांच्या संपर्कात असल्याचे समजते. या कुटुंबाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला; मात्र तो होऊ शकला नाही.

सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चौकशीची मागणी

पीडित कुटुंब १ ऑक्टोबर रोजी दिंडोशीतील 'नागरी निवारा' परिसरातील इमारतीत राहायला आले होते. ते संशयित अल्पवयीन मुलीच्या कुटुंबाच्या समोरच्या फ्लॅटमध्ये राहत होते. घटनेनंतर सीसीटीव्ही फुटेजमध्ये चिमुरडीला डक्टमध्ये फेकले जात असल्याचे दिसत असल्याचा दावा मृत मुलीच्या नातेवाइकांनी केला आहे.

त्यांच्या म्हणण्यानुसार, कथित घटनेनंतर संशयित मुलगी सहाव्या मजल्यावरील आपल्या घरात जाताना दिसते. त्यानंतर ती पुन्हा सायकल चालवताना दिसल्याचा दावाही करण्यात आला आहे. या प्रकरणात सीसीटीव्ही फुटेजमधे दिसणाऱ्या आणखी एका मुलीच्या भूमिकेचीही चौकशी करण्यात यावी, अशी मागणी पीडित कुटुंबीयांनी केली आहे. दरम्यान, या प्रकरणातील आरोपांची सत्यता आणि संबंधित व्यक्तींची भूमिका तपासातून स्पष्ट होणार आहे.



पवई सार्वजनिक दुर्गोत्सव २०२६ मध्ये, एल अँड टी रियल्टीच्या पनवेल येथील प्रमुख निवासी प्रकल्प 'क्रेस्टोरिया इस्टेट' आधारित एक फोटो बूथ उभारण्यात आला आहे, जो या प्रकल्पाची वैशिष्ट्यपूर्ण वास्तुशिल्प रचना दर्शवतो.

YASH MANAGEMENT & SATELLITE LTD.

Regd Office: 303, Morya Landmark I, Opp Infiniti Mall, Off. New Link Road, Andheri (West), Mumbai-400053 **CIN: L65920MH1993PLC073309**

Extract of Unaudited Standalone and Consolidated Financial Results for the Quarter and Half Year Ended 30th September, 2026

(Rs. In Lakhs)

Sr. No.	Particulars	STANDALONE						CONSOLIDATED					
		Quarter Ended			Half Year Ended		Year Ended	Quarter Ended			Half Year Ended		Year Ended
		30.09.2026	30.06.2026	30.09.2025	30.09.2026	30.09.2025	31.03.2026	30.09.2026	30.06.2026	30.09.2025	30.09.2026	30.09.2025	31.03.2026
		(Unaudited)			(Unaudited)		(Audited)	(Unaudited)			(Unaudited)		(Audited)
1.	Total Income from Operations	1039.83	993.76	361.82	2033.59	835.49	2803.89	1151.53	1053.82	379.96	2205.35	866.07	2825.33
2.	Net Profit/(Loss) before Exceptional items and Tax	(0.06)	87.69	(104.57)	87.63	(89.89)	(0.98)	30.49	138.62	(75.68)	169.11	(50.61)	16.71
3.	Net Profit/(Loss) before tax after Exceptional items	(0.06)	87.69	(104.57)	87.63	(89.89)	(0.98)	30.49	138.62	(75.68)	169.11	(50.61)	16.71
4.	Net Profit/(Loss) after tax	10.59	74.20	(102.72)	84.79	(89.89)	(0.98)	41.14	125.13	(73.83)	166.27	(50.61)	16.72
5.	Total Comprehensive Income for the period net of tax	(7.03)	133.11	(92.65)	126.08	(40.01)	19.17	23.52	184.04	(63.76)	207.56	(0.73)	36.87
6.	Equity Share Capital (Face value Rs. 10/- per share)	1700	1700	1700	1700	1700	1700	1700	1700	1700	1700	1700	1700
7.	Reserve excluding Revaluation Reserve	-	-	-	992.14	807.06	866.23	-	-	-	-	-	-
8.	Earnings Per Share												
	1. Basic& Diluted:	(0.04)	0.78	(0.55)	0.74	(0.24)	0.11	0.07	0.97	(0.44)	1.03	(0.09)	0.18

Notes:

1. The above unaudited consolidated and standalone financial results have been reviewed by the Audit Committee and have been approved by the Board of Directors at their respective meetings held on 19th October, 2026 pursuant to Regulation 33 of SEBI (Listing Obligation and Disclosure Requirements), Regulations 2015 (as amended), The above results have been prepared in accordance with Indian Accounting Standards ('Ind AS') notified under Section 133 of the Companies Act, 2013, read together with the Companies (Indian Accounting Standards) Rules, 2015 (as amended).
2. The above is the extract of the detailed format of Quarterly financial results filed with the Bombay Stock Exchange Limited under regulation 33 SEBI (Listing Obligation and Disclosure Requirements), Regulations 2015. The full format of Quarterly /Annual Financial Results are available at www.bseindia.com and www.yashmanagement.in

By order of the Board
For Yash Management and Satellite Ltd
Sd/-
Yash Gupta
Managing Director
DIN:07638743

Place: Mumbai
Date: 19th October, 2026